RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# पुण्यस्मरण महामानवाचे

**प्रा. सौ. शैला प्र. हजारे**
पर्यावरणशास्त्र
आयसीएल्ईएस्’ मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
वाशी, नवी मुंबई 400703

**प्रस्तावनाः**

**दिव्यत्वाची जिथे प्रचितीथे कर माझे जुळती!**

सदर आचार विचार ज्यांच्या बाबतीत तंतोतंत खरा ठरतो, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व दीनदलीतांचे कैवारी ह्या उपाधी ज्यांना दिल्या जातात ते थोर विचारवंत महामानव उच्च विद्याविभूषित,समाजोसुधारक डॉ, भिमराव रामजी आंबेडकर उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांना माझे कोटी कोटी प्रणाम! आंबेडकर ही व्यक्ती नसून वास्तवातीत तो एक आचार विचार होता, संपूर्ण मानवजातीला माणूसकीने वागण्याची, प्रत्येकातील मनुष्यत्वाची जाणीव ज्यांनी करुन दिली,युगानुयुगे घोर निद्रेत असलेल्या अस्पृशांना ज्यांनी जागे केले, प्रत्येक शोषितामध्ये ज्यांनी अस्मितेची ठिणगी पेटविली त्या डॉ,बाबासाहेब आंबेडकरांनी काय कमी सोसले? पावलोपावली अवहेलना, अपमान, तुच्छता, उपेक्षित जगणे या विरुध्द लढण्यासाठीच जणू त्यांचा जन्म झाला असावा, विषमतेचे पालनपोषण करणाऱ्या या देशात दि, 14 एप्रिल 1891 रोजी सुभेदार रामजी व भीमाबाई या दाम्पत्यास चौदावे अपत्य झाले त्याचे नाव भिमराव, सुशिक्षित, सुसंस्कृत, मराठी व हिन्दी साहित्याविषयी प्रेम असलेले, शिक्षणाविषयी जाणीव असलेले, टापटीप राहणीचा आनंद घेणारे व दूरदृष्टी असलेले सुभेदार रामजी वडील म्हणून लाभल्याने लहान पणापासूनच भिमरावांवर संस्कार होत राहिले. त्यांच्या शिक्षणाची सुरुवातही अगदी योग्यवेळी म्हणजे 1896 मध्ये झाली. भीमराव एकापेक्षा एक वरचढ अशा पदव्या मिळवीत जिद्दीने सत्तावीस वर्षे शिक्षण घेत राहिले, व ज्ञानसंपन्न होत राहिले. बी.ए मुंबई विद्यापीठ, एम ए पीएच डी कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका एम एस्सी डी एस्सी लंडन विद्यापीठ बार ॲट लॉ लंडन अशा पदव्या त्यांनी प्राप्त केल्या. त्या काळी भारतात महार जातीला शिक्षण घेता येणार नाही अशी जाचक बंधानात्मक सामाजिक परिस्थिती होती. याच जातीत जन्मलेल्या एकाने देशातील आणि परदेशातील विविध वरचढ अशा पदव्यांनी विभूषीत वव सन्मानित व्हावे हा एक विलक्षण चमत्कार होता. बाबासाहेबांना लहानपणापासूनच जातीमुळे तिरस्कृत व अपमानीत व्हावे लागत होते, तरीदेखील लक्षं शिक्षण घेऊन समर्थ व ज्ञानी बनवण्याच्या प्रयत्नावरच केंद्रित होत असे. सुरुवातीपासूनच त्यांना जे.जे. उत्तम असेल त्याचा स्वीकार करीत राहण्याचा आणि उदात्त रचनात्मक कृती करीत राहण्याचा सुसंस्कार त्यांचे वडील रामजी यांच्याकडून लाभला. म्हणजे शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी कोण्या एका नाटकातील ऐकलेला सुविचार –

देणाऱ्याचे हात हजार
सुखही देती दुःखदेती

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तुला हवे ते तू स्वीकार

देणाऱ्याचे हात हजार

त्यांच्याबाबतीत सार्थच ठरतो, नव्हे त्यांनी तो सार्थ ठरवून दाखविलाच.

जातीभेदावर आधारीत तिरस्काराच्या व आपमानाच्या व्यवहाराने निरुत्साही, निराश व निष्क्रिय होऊन राहण्यापेक्षा संस्कारशील भीमराव निश्चयपूर्वक सदैव उत्साही, आशावादी आणि सक्रिय राहणे पसंत करीत असत, म्हणून तर ते सर्व प्रकारच्या परिस्थितीवर मात करीत प्रगतीच्या दिशेने दुर्दम्य महत्वाकांक्षेसह निरंतन उंच उंच उभारी घेत राहिले. रोपटयाच्या सालीवर कोरलेली अक्षरे झाडाच्या वयाबरोबर वाढतच राहिली. त्या काळात अस्पृशांची लोकसंख्या अंदाजे सहा कोटी म्हणजे हिन्दू समाजातील प्रत्येक पाचवा घटक  या समाजाचे जीवन निरक्षरता व अज्ञानामुळे मातीमोल झाले आणि हा समाज धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक बंधनामुळे अगदी माणूसकीस पारखा झाला होता. या सहा कोटी लोकांना माणूसकीचे हक्क मिळवून देऊन हिन्दू समाजातील सर्वात खालच्या थराची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नती झाली तर देशाच्या सामर्थ्यात आणि बुद्धी वैभवात भर पडेल अशी त्यांची धारणा होती. भारतातील पददलीतांना स्वावलंबन, स्वाभिमान नि आत्मोद्धार यांची शिकवण देऊन देशात महापरीवर्तन घडवून आणण्यास बाबासाहेबांनी प्रारंभ केला. काळाच्याही पुढे जाऊन फक्त शिक्षण, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर आपण समाजात बदल घडवू शकतो हा विचार केवळ बाबासाहेबांनीच करावा.

डॉक्टरांच्या कार्याचा उल्लेख करताना त्यांनी सर्व भारतीयांना घटनेतून दिलेले मानवी हक्काचे वरदान. मूलभूत अधिकारांमध्ये 1 समानतेचा अधिकार 2 स्वातंन्न्याचा अधिकार 3 अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार 4 धर्म स्वातंन्न्याचा अधिकार 5 शिक्षणाचा अधिकार 6 घटना दुरुस्तीचा अधिकार असे मूलभूत अधिकार देऊ केले. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना कायद्यानेच समान ठरविले. या मूलभूत अधिकाराने सर्व स्त्री पुरुष सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना भारताचे नागरीक म्हणून समान अधिकार दिला तसेच लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकासाठी, लोकाकडून चालविलेले राज्य या कल्पनेची स्थापना भारतात झाली. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेबांनी कित्येक दिवस मेहनत घेऊन जगात सर्वात मोठी राज्य घटना लिहिण्याचे काम केले. त्याचबरोबर सर्व मानवाला आपल्या कर्तव्याची ही जाणीव करुन दिली. हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नागरीक म्हणून हक्क बजावताना आपली नागरीक म्हणून कर्त्यव्ये पाळलीच पाहिजेत. आज आपण सर्वजण या हक्क व कर्तव्याचे कितपत पालन करतो हा तर सर्वाच्याच आत्मपरिक्षणाचा नाजूक विषय आहे.

आंबेडकरांना हिन्दू समाजात सुधारणा करावयाच्या होत्या. हिन्दू समाजातील जातीभेद नष्ट व्हावा व अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन व्हावे ही बाबासाहेबांची तीव्र इच्छा होती. अस्पृश्यता हा मानवजातीला लागलेला कलंक आहे; स्त्रीयांना आजही अनेक मंदीरात प्रवेश बंदी आहे. त्यांनी ज्या महत्वाच्या चळवळी हाती घेतल्या त्या 1 अस्पृश्यांना मंदिर प्रवेश व 2 अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास केलेली

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

केलीली बंदी. अनेक ठिकाणी बाबासाहेबांनी अस्पृश्य लोकांच्या सभा घेतल्या व सत्याग्रह करण्यासाठी लोकांना प्रोत्साहीत केले. अमरावतीच्या अंबाबाई मंदीरात, पुणे येथील काळाराम मंदीरात जे सत्याग्रह केले ते समतेच्या हक्काच्या भावनेतून. हा धार्मिक समतेचा हक्क मिळावा म्हणून देशभर सत्याग्रह सुरु झाले व ठिकठिकाणी अस्पृश्यांना मंदीर प्रवेशासाठी लढा उभारावा लागला. ज्या हिन्दू धर्मात आपणाला मंदीर प्रवेश नाकारला जातो, देवपूजेचा अधिकार नाकारला जातो त्या हिन्दू धर्मात राहण्यात तरी काय अर्थ आहे; असे बाबासाहेबांना वाटू लागले. समतेसाठी सामाजिक क्रांती घडवून आणणे हे बाबासाहेबांना अधिक महत्वाचे वाटू लागले. त्यांनी अस्पृशांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणली.

तेच महाडच्या चवदार तळयासंदर्भात घडले. सार्वजनिक ठिकाणी अस्पृशांनी पाणी भरण्यासाठी येऊ नये, त्यांचा स्पर्श नको, त्याने विटाळ होईल अशा मूर्ख कल्पना स्पृशांमध्ये होत्या. त्यामुळे अस्पृशांना तेथे पाणी पिऊ देखील दिले जात नव्हते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती असून पाणी पिण्याचा व भरण्याचा समान अधिकार असला पाहिजे याच भूमिकेतून बाबासाहेबांनी चवदार तळे सत्याग्रह केला. ते म्हणाले कि चवदार तळयाचे पाणी पिल्याने अस्पृश्य अमर होणार नाहीत, ना स्पृश्य अमर होणार नाहीत. हा सत्याग्रह म्हणजे समानतेची मुहूर्तमेढ होती. सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा हक्क हा माणुसकीचा हक्क आहे आणि तो लढा यशस्वी झाला.

मंदीर प्रवेश व पिण्याच्या पाण्यासाठीच्या सत्याग्रहाने अस्पृश्यामध्ये हिम्मत, जिगर आणि जिद्द जाग्रत झाली. अस्पृश्योद्धाराचे महत्वाचे कार्य गतीशील झाले.

लहानपणापासूनच आंबेडकर अनुभवीत होते कि हिन्दू धर्मात अस्पृश्यता टोकाची पाळली जाते. अस्पृश्यावर धर्माच्या नावाखाली अनेक अत्याचार होत होते. म्हणून सक्षम बाबासाहेबांनी धर्माच्या बाबतीत वेगळा विचार सुरु केला. जर हिन्दू, ख्रिस्ती व मुस्लीम धर्मियांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरु देत असेल तर अस्पृशांनी धर्मांतर करावे म्हणजे आपोआप हा प्रश्न मिटेल म्हणून त्यांनी 13 ऑक्टोंबर 1935 रोजी येवले येथे अस्पृशांनी धर्मांतर करावे अशी घोषणा केली. त्यानंतर सुमारे वीस वर्ष त्यांनी यावर चिंतन केले. वेगवेगळया धर्माचा अभ्यास केला, व स्वतः 14 ऑक्टोंबर 1956 रोजी त्यांनी बौद्ध धर्मांचा स्वीकार केला. लाखो अस्पृशांनी त्यांच्याबरोबर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

आज या महामानवाचे स्मरण करताना वाटते की ते ज्या प्रश्नासाठी लढले, ते प्रश्न आजही वेगळया स्वरुपात शिल्लक आहेतच. अस्पृश्यतेची जागा कदाचित प्रादेशिकतेने घेतलेली असेल, पण मानवजातीचे प्रश्न, समानतेचे प्रश्न आजही भेडसावीत आहेत. मराठवाडा व आसपासच्या काही भांगामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. पाण्यावाचून माणसे व जनावरे तडफडत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील काही लोक तहानलेल्या मराठवाडयाला पिण्यासाठी पाणी द्यायला तयार नाहीत. ही कसली माणुसकी? ही कसली समानता? आज बाबासाहेब असते तर त्यांना यासांठीही सत्याग्रह करावा लागला असता. पश्चिम महाराष्ट्रातील उसाचे मळे, बागा फुलल्या पाहिजेत या बद्दल दुमत नाही पण त्याच बरोबर मराठवाडयातील माता – भगीणींची पाण्यासाठीची वणवण थांबली पहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या शिकवणुकीतून आजचे नेते निदान एवढा तरी बोध घेतील अशी अपेक्षा आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आजच्या नेतृत्वामध्ये बाबासाहेबासारखा सुसंस्कृतपणा तरी आहे का? मुळात त्यांचा जन्मच सुसंस्कृत घराण्यात झाला. त्यांचे सर्वच विषयांवर आफाट वाचन व चिंतन होते. आजच्या नेतृत्वात बाबासाहेबासारखी सामाजिक तळमळ देखील दिसत नाही. आपले ज्ञान व स्वतःजवळील साधन याचा सदुपयोग केला पाहिजे, देश, समाज, दीन, दलित, उपेक्षित, अशिक्षित, अन्यायपीडित, अत्याचार पीडित, अशा लोकांच्या हक्कासाठी बाबासाहेबांनी आयुष्य वेचले. स्पृश्य व शोषित वर्गासाठी शिक्षण, आर्थिक, राजकीय संधी उपलब्ध व्हाव्यात, हा समाज सामर्थ्यवान व्हावा व तो खऱ्या अर्थाने बंधमुक्त आणि स्वतंत्र व्हावा यासाठी बाबासाहेबांनी आपले उभे आयुष्य वेचले.

बाबासाहेबांचे स्मरण म्हणजे बुद्धीचे स्मरण!

बाबासाहेबांचे स्मरण म्हणजे समानतेचे स्मरण!

बाबासाहेबांचे स्मरण म्हणजे स्वार्थत्यागाचे स्मरण!

बाबासाहेबांचे स्मरण म्हणजे न्यायाचे स्मरण!

बाबासाहेब म्हणजे सद्‌गुणसंपन्नता!

आणि म्हणून बाबासाहेब महामानव, भारत मातेचे सुपुत्र! भारताचे भाग्यविधाते!, मानव जातीचे उद्धारक! म्हणून म्हणावेसे वाटते कि हे परआत्मा माझ्या देशबांधवाना बाबासाहेबांचे स्मरण अखंड घडो व त्यांच्या विचाराचा विसर कधीही न पडो.

,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,